२२७५४ M

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** कुरखेडा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0142 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**07/08/2025 07:38

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 05/08/2025

**Date To ( दिनांक पर्यंत):** 06/08/2025

**Time From (वेळेपासून):** 16:21 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 20:33 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 07/08/2025 **Time (वेळ):** 07:38 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 009

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/08/2025 07:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पुनम भाकरे यांचे घरी भाड्याने, कुरखेडा,कुरखेडा, 441209

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** मुजाहीद मसुद शेख

**(b) Father's Name (वडील चे नाव) :** मसुद शेख

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आंबेडकर वार्ड कुरखेडा,कुरखेडा,कुरखेडा,कुरखेडा,गडचिरोली,महाराष्ट्र, 441209,भारत |
| 2 | स्थायी पता | आंबेडकर वार्ड कुरखेडा,कुरखेडा,कुरखेडा,कुरखेडा,गडचिरोली,महाराष्ट्र, 441209,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):** दुकानदार

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9422668484

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रविंद्र सदाशिवराव दिकोंडवार | | वडील का नाम : सदाशिवराव दिकोंडवार | 1. कुरखेडा,कुरखेडा,कुरखेडा, गडचिरोली,महाराष्ट्र,भारत-441209 |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

तक्रार दाराने आज रोजी पोस्टेला तक्रार दिल्याने

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with CamScanner

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | vivo कंपनीचा Y21G मडेलचा मोबाईल 01 नग | 20,000.00 |
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | ध्वनी उपकरणे | सनडीक्स कंपनीचे मेमरी कार्ड 02 नग | 0.00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रोख रक्कम 500 रू. दराच्या 140 नोटा | 70,000.00 |
| 4 | इतर | घरगुती वस्तु | आकाशी निळया रंगाची सक 01 नग | 210.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

90,210.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

पोलीस स्टेशन कुरखेडा
दिनांक 07/08/2025

नांव:- श्री.मुजाहीद मसुद शेख, वय 36 वर्षे, धंदा-शेती/किराणा दुकान रा. आंबेडकर वार्ड कुरखेडा ता कुरखेडा जि. गडचिरोली मो.क्र. 9422668484

मी दिनांक 05/08/2025 रोजी 11.00 वा. दरम्यान लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील श्री. चंद्रशेखर ढोले साहेब यांना त्यांचे मोबाईलवर फोन करून एका लोकसेवका विरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार असल्याबाबत माहिती दिली. त्यावर श्री.चंद्रशेखर ढोले साहेबांनी 14.20 वा. च्या दरम्यान मौजा कुरखेडा गावालगत रोडच्या कडेला हजर राहा असे सांगितले. त्याप्रमाणे मी 14.15 वाजता दरम्यान कुरखेडा गावाच्या बाहेर वडसा बाजुकडे रोडच्या कडेला एम एच 33 के 1786 या दुचाकी वाहनाने हजर होतो. थोडयाच वेळात श्री. चंद्रशेखर ढोले साहेब हे दोन शासकिय वाहनाने कुरखेडा गावाच्या रोडच्या कडेला 14.20 वा. पोहचले. त्यांचे सोबत असलेल्या शासकिय पंच व स्टाफचा त्यांनी मला परीचय करून देवुन मला माझी तक्रार विचारता मी त्यांना माझी तोंडी तक्रार थोडक्यात कथन केली असता त्यांना एका लोकसेवकाने माझेकडे लाच मागणी केल्याचे प्रथमदर्शनी निष्पन्न होत असल्याने त्यांनी मला लेखी तक्रार देणेस सांगीतल्याने त्यांचे समक्ष एका लोकसेवकाविरूद्ध लाच मागणी संबंधाने माझी लेखी तक्रार दिली ती खालीलप्रमाणे आहे.

मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,गडचिरोली कॅम्प कुरखेडा येथे आज दिनांक 05/08/2025 रोजी हजर येवुन लेखी तक्रार देतो की, मी वरील पत्यावर कुटूंबासह राहत असून शेतीचे व किराणा दुकानाचे काम करतो.

मौजा कुरखेडा येथील सर्वे नंबर 88 मध्ये 0.49 हे.आर शेतजमीन असुन त्यापैकी माझे नावे सातबाऱ्यानुसार 0.25 हे.आर शेतजमीन आहे व उर्वरीत 0.24 हे.आर शेतजमीन श्री पोटे व श्री रासेकर यांचे नावे आहे. सदर सर्वे नंबर मधील शेतजमीनीची मोजणी करून माझे पोटहिस्सा (कजापा) व सातबारा वेगवेगळा करणे असल्याने मी दिनांक 15/05/2025 रोजी भुमी अभिलेख कार्यालय कुरखेडा येथे अर्ज दिला. त्यानंतर दि. 26/05/2025 रोजी दुपारी 03 ते 04 वाजता दरम्यान मी दिलेल्या अर्जासंबधाने विचारपुस करण्यासाठी भुमी अभिलेख कार्यालय कुरखेडा येथे गेलो असता श्री दिकोंडवार बाबुसाहेब यांना भेटुन अद्यापपर्यंत मोजणीकरीता त्यांनी चालान काढुन दिले नसल्याने विचारणा केली असता त्यांनी मला ''तुमच्या शेतीचा प्राब्लेम आहे, मोजणीचा आपला चालान मी बनवुन देणार नाही. आणी सध्या आमचा संप सुरू आहे. तुम्ही एखाद्या दिवशी मला ऑफीस संपल्यावर संजिवनी हॉस्पीटल जवळील माझे भाडयाच्या खोलीजवळ येवुन भेटा, मी बोलतो तुंम्हाला बाकीचे, आणी मोजणीचा चालान काढून



Scanned with CamScanner

देतो,'' असे म्हणाले. त्यावर मी ''ठिक आहे साहेब, तुमचा संप संपल्यानंतर चालान काढुन द्या.'' असे म्हणालो. त्यानंतर काही दिवसांनी त्यांचा संप संपल्यानंतर सुद्धा मी त्यांच्या ऑफीसमधे जावुन माझे कामासंदर्भाने माहीती घेतली असता त्यांच्याकडुन माझे कामासंदर्भाने कोणतीही कार्यवाही केली गेली नाही. मी देखील माझ्या इतर महत्वाच्या शेतीच्या कामात व्यस्त असल्याने अर्जासंदर्भात सरकारी नियमानुसार कार्यवाही होईल या भरवशावर राहीलो.

बरेच दिवस होवुन सुद्धा दिकोंडवार साहेबांनी मला जमिन मोजणीचे चालान काढुन न दिल्याने मी त्यांना काल दिनांक 04/08/2025 रोजी दुपारी 03.45 वा. च्या सुमारास त्यांच्या ऑफीसकडे गेलो असता ते मला त्यांच्या ऑफीसच्या बाहेरच रस्त्यावर भेटले. मी त्यांना माझे जमिन मोजणीच्या अर्जाबाबत विचारणा केली असता त्यांनी मला सांगीतले की ''तुम्ही मला घरी भेटायला आलेच नाही. तुमच्या कामाचे मी बोलणार होतो. तुंम्ही उशीर करून राहीलेत तुमच्या कामाला,'' असे बोलल्यावर मी त्यांना ''सरकारी काम करायला येवढे दिवस लागतात का, घरी का बोलवताय, मला चालान काढुन द्या'' असे सांगीतल्यावर त्यांनी मला त्यांच्या उजव्या हाताचे तर्जनीचे एक बोट दाखवुन नंतर पैसे मोजल्याचा अंगठा आणी तर्जनीचा इशारा केला. त्यावर मी त्यांना ''इसका मतलब क्या है सर'' असे विचारलो असता त्यांनी मला ''तुंम्ही मला चालान काढुन देण्याच्या कामासाठी 1,00,000/- रू. दया, नाहीतर मी काही चालान काढुन देणार नाही.'' त्यावर मी त्यांना ''चालानची कायदेशीर फी एवढी नसते'' असे सांगीतले असता त्यांनी मला ''हे मी करणार असलेल्या कामाचे आहेत, काम करायचे असेल तर एक लाख रूपये घेवुन उद्या दुपारी किंवा संध्याकाळी एकटयाने भेटायला ऑफीसमध्ये नाहीतर घरी या'' असे बोलुन मला पैशाची मागणी करून निघुन गेले.

भुमी अभिलेख कार्यालय कुरखेडा येथील श्री. दिकोंडवार बाबुसाहेब, यांनी मला शेतजमीनीचा पोटहिस्सा मोजणी व सातबारा वेगळा करून देण्यासाठी चालान काढून देण्याचे कामाकरीता 1,00,000/- रू लाच रक्कमेची मागणी केली आहे. श्री. दिकोंडवार बाबुसाहेब यांना रुपये 1,00,000/- लाच रक्कम देण्याची माझी मुळीच ईच्छा नाही. त्यांचे विरूध्द कारवाई होणेकरीता मी स्वेच्छेने आज सकाळी 11.00 वा. अँन्टी करप्शन गडचिरोली येथे फोन करून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गडचिरोली कॅम्प कुरखेडा येथे तक्रार देण्यास आलो. लाच मागणी रक्कम 1,00,000/-रू. मी सोबत आणले असुन ते माझे वैयक्तीक बचतीचे आहेत. श्री दिकोंडवार बाबुसाहेब, भुमी अभिलेख कार्यालय कुरखेडा यांचेशी माझे कोणतेही वैयक्तीक दुश्मनी नसुन आर्थिक देवाण-घेवाण/उसणवारी अथवा भांडण नसुन मी स्वेच्छेने तक्रार देत आहे. मी भुमी अभिलेख कार्यालय कुरखेडा येथे पोटहिस्सा मोजणीकरीता दिलेला अर्ज सोबत जोडत आहे.

त्यानंतर श्री. चंद्रशेखर ढोले साहेबांनी त्यांचे सोबत आलेल्या शासकिय पंचांना माझी लेखी तक्रार वाचण्यास दिली. तसेच मी त्यांना माझी सदरची तक्रार समक्ष सांगीतली त्यांची खात्री करुन सदरच्या तक्रारीवर दोन्ही पंचांनी व श्री. ढोले साहेबांनी स्वाक्षरी केली. गै.अ. श्री. दिकोंडवार बाबुसाहेब यांनी मला दि. 05/08/2025 रोजी भुमी अभिलेख ऑफीस किंवा घरी लाच रक्कम घेवून बोलाविले असल्याने श्री. ढोले साहेबांनी पंच क्र. 1 सह मला भुमी अभिलेख कार्यालय कुरखेडा येथे पाठवून लाचेची मागणी संबंधाने प्रत्यक्ष पडताळणी करण्याचा दोन्ही पंचांसमक्ष निर्णय घेतला. त्यानंतर मी श्री. चंद्रशेखर ढोले साहेब यांचेकडे सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी माझे वैयक्तीक बचती मधिल आणलेली 1,00,000/-रूपये हजर केले. त्यावेळी त्यांनी सदर नोटांचे क्रमांक पंचांसमक्ष नोंदवुन घेतले. त्यानंतर सदरच्या नोटांवर अँथ्रसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन सापळा कारवाई पथकातील श्री. प्रविण जुमनाके यांनी सदर पावडरचे गुणधर्म सांगुन सदर पावडर कशा प्रकारे प्रकाशात व अंधारात काम करते याचे प्रात्यक्षिक दाखवले. तद्नंतर मी त्यांचेकडे कारवाई कामी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेस अँथ्रसिन पावडर लावली व त्याचे प्रात्यक्षीक करून दाखविले. सदर पावडर लावलेली रक्कम एका खाकी रंगाचे कागदी लिफाप्यात सुरक्षित ठेवुन श्री. चंद्रशेखर ढोले साहेब यांनी स्वतःचे ताब्यात ठेवली. त्यानंतर पंचासमक्ष श्री. चंद्रशेखर ढोले साहेबांनी दिलेल्या सुचनेवरून सापळा कारवाई पथकातील श्री. घोरमोडे यांनी दोन्ही पंचांसमक्ष सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण सदर डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. त्यानंतर श्री. ढोले साहेबांच्या सुचनेवरून दोन्ही पंचांनी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत मला व दोन्ही पंचांना सविस्तर सुचना दिल्या. श्री. ढोले साहेबांच्या सुचनेवरून श्री. घोरमोडे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमोरी कार्ड टाकुन सदर मेमरी कार्डात पुर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करवुन देवुन वेळ 16.21 वा. व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 श्री. अशोक रामटेके यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे शर्टाचे आतमधील बनियानला लटकवून ठेवून मला पंच क्रं. 1 श्री. अशोक रामटेके यांचेसह भुमी अभिलेख कार्यालय कुरखेडा येथे मी आणलेल्या एम एच 33 के 1786या दुचाकी



Scanned with CamScanner

वाहनाने पाठविण्यात आले.
मी व पंच क्र. 1 असे दोघेही भुमी अभिलेख कार्यालय कुरखेडा येथे जावून श्री. दिकोंडवार बाबु यांना भेटलो असता त्यांनी मला ''सेवापटाचे महत्वाचे काम सुरू आहे, तुम्ही संध्याकाळी 07.30 वा.दरम्यान मला घराकडे भेटा'' असे सांगितल्याने घडलेली हकीकत सांगणेकरीता मी, पंच क्र.1 सह नियोजित ठिकाणी परत आलो. लाच रक्कम मागणी बाबतची पडताळणी कारवाई करून परत आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर 16.42 वाजता बंद केले. नंतर दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेतली. यानंतर श्री. ढोले साहेबांनी पंच क्र. 1 व मला श्री. दिकोंडवार यांचेसोबत झालेल्या संभाषणाबाबत विचारणा केली.
यानंतर श्री. ढोले साहेबांनी दोन्ही पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमधले संभाषण ऐकूण व पंच क्र.1 यांचे समक्ष घडलेल्या परिस्थीतीच्या कथनावरून श्री. दिकोंडवार यांनी मला संध्याकाळी 07.30 वा. दरम्यान त्यांचे घरी बोलाविल्याची खात्री केली. गै.अ. दिकोंडवार यांनी संध्याकाळी 07.30 वाजता घरी बोलाविल्याने व रात्रीची वेळ होत असल्याने श्री. ढोले साहेबांनी दोन्ही पंचासमक्ष कुरखेडा गावाचे बाहेर असलेल्या बसस्टॅण्ड चे बाजुला निर्जनस्थळी कॅम्प लावून पुढील सापळा कारवाई करण्याचा निर्णय घेवून बसस्टॅण्ड कुरखेडाच्या निर्जन स्थळी कॅम्प लावला.
त्यांनतर श्री. ढोले साहेबांच्या सुचनेवरून दोन्ही पंचांनी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर पुन्हा व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून वेळ 20.18 वा. व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे शर्टचे आतमधील बनियानला लटकवून ठेवून मला पंच क्रं. 1 श्री. अशोक रामटेके यांचेसह गै.अ. श्री. दिकोंडवार हे राहत असलेल्या घरी मी आणलेल्या एम एच 33 के 1786 या दुचाकी वाहनाने पाठविण्यात आले. मी व पंच क्र. 1 असे दोघेही श्री. दिकोंडवार यांचे घराजवळ गेलो असता श्री. दिकोंडवार बाबु हे त्यांच्या किरायाच्या खोलीच्या समोरच असलेल्या मेसमध्ये दिसल्याने मी पंचासह त्यांचे जवळ जावून पंचांना आमच्या बाजूस बसण्याचा इशारा करून त्यांचेशी बोलण्यास सुरूवात केली असता त्यांनी मला क्या बोलते असे बोलून मला उजव्या हाताच्या बोटाचा एक चा इशारा केला. त्यावर मी त्यांना 'मेरे चालान का काम निपटा दो सर बहोत टाईम हु आ क्या बोलते आप बोलो सर, असे बोललो असता त्यांनी ' तुमीच तो नही बोलते असे बोलून पुन्हा उजव्या हाताच्या तर्जनीच्या बोटाने एकचा ईशारा करून पैसे मोजल्याचा तर्जनी व अंगठयाचा ईशारा करून एक लाखाची मागणी केली. त्यावर मी पुन्हा काम करून देण्याची विनंती केली असता त्यांनी 'अभी है, कहा पे है' असे विचारले असता मी त्यांना 'अभी लाता पैसे' या घर से लाता असे सांगितले. मी त्यांना कामाबाबत विनंती करीत असतांना ते मला हाताच्या बोटाच्या ईशाऱ्यानेच एक लाखाची मागणी करू लागल्याने मी त्यांना तोंडाने स्पष्ट बोलण्याची विनंती केली. मी त्यांना '' चालान निकलवा दो सर मेरा, असे बोललो असता त्यांनी ''मैने बोला तो था'' असे बोलले. त्यावर मी त्यांना '' कित्ते सर'' असे बोललो असता त्यांनी 'बोला तो था' असे म्हणून पुन्हा उजव्या हाताचा तर्जनीच्या बोटाने एकचा आकडा दाखवून एक लाख पुर्वी बोललेल्या रक्कमेचा ईशारा केला. मी पुन्हा त्यांना विचारणा केली असता त्यांनी अगदी हळुवार आवाजात 'एक लाख' असे बोलले. त्यावर मी त्यांना 'नही सर वो ज्यादा होते' असे सांगितले असता आमच्या जवळपास असलेले लोक व पंच यामुळे श्री. दिकोंडवार बाबु यांनी मला डोळयाने व मानेने ईशारा करून सोबत चालण्यास सांगितले असता मी त्यांच्या सोबत पायी जावू लागलो. त्यावेळी पंच क्र. 1 हे येण्याचा प्रयत्न केले असता श्री. दिकोंडवार बाबु यांनी त्यांना सोबत न येवू देण्याचा मला ईशारा केला म्हणून मी पंचांना तेथेच बसून राहण्याचा ईशारा करून आम्ही थोडे लांब जावून बोलत थांबलो. श्री. दिकोंडवार बाबु यांना मी माझे काम कायदेशीर आणि निर्दोष असल्याचे सांगून जमिन मोजनीचे चालान काढून देण्याची विनंती करून त्यांना तोंडी बोलण्यास सांगितले असता ते माझे सोबत बोलत बोलत पेट्रोल पम्प रोडकडे जात असतांना उजव्या हाताच्या बोटाने वारंवार एक लाख रक्कमेची मागणी करीत होते. मी त्यांना '' ज्यादा हो गये सर, ज्यादा हो गये न सर'' असे म्हणून काही तरी रक्कम कमी करण्यास सांगितले असता त्यांनी मला '' नही होते, नही होते, पहलेच तो बात हो गयी थी, कहा जादा हो गये, लेकीन वो कैसा है , रिस्की काम है असे बोलून पैसे कमी करीत नसल्याने मी त्यांना पुन्हा पैसे कमी करण्यास सांगत असता ते मोबाईलमध्ये किपॅडवर डायल नंबरच्या ठिकाणी 1,00,000 चा आकडा टाईप करून दाखवून पैशाचे ईशारे केले. मी त्यांना हे खूप जास्त होते असे सांगितले तसेच त्यांना टप्पा करून देण्यास सांगितले असता त्यांनी '' टप्पा वगैरा कुछ नही चलता, पैसे का व्यवहार कभी भी टप्पे पे नही जाता' 'ये लिगल पैसे थोडी न है, लिगल पैसे नही है, ये मेरे काम का है'' असे बोलून लाच रक्कमेची मागणी केली. मी त्यांना पुन्हा तोंडी बोलण्याची विनंती करून ' एक लाख ज्यादा होते सर' असे बोललो. त्यावर त्यांनी '' नही होते'' असे बोलून लाच रक्कमेचे पैसे कमी करीत नसल्याने मी त्यांना पुन्हा पैसे कमी करण्याची विनंती केली असता त्यांनी त्यांच्या मोबाईलच्या किपॅडवर 80,000 हा आकडा टाईप करून मला दाखविला त्यावर मी त्यांना 'सर आप आकडा वगैरा मत दिखाओ अस्सी हजार का, ज्यादा हो जाता, आप मुंह से बोल दो ना'' असे सांगितले असता त्यांनी जाने दो जी उपरसे आनेदो क्या टेंन्शन



Scanned with CamScanner

लेते, मै भी टेन्शन नही लेता असे बोलून पैसे न दिल्यास माझे काम करणार नसल्याने मला सांगितले. म्हणून मी पुन्हा त्यांना कामाची विनंती केली असता त्यांनी कुछ भी बोलने बाकी नही अभी, असे सांगितल्यावर मी पुन्हा त्यांना अस्सी हजार का आकडा दिखाया आपने सर, मै क्या बोलता चालीस कर दु , असे बोलून त्यांना पैसे कमी करण्याची पुन्हा विनंती केली असता त्यांनी '' नही होगा, कैसे होगा, नही होगा, उपरमे भी देना पडता है हमको' असे बोलले. यानंतर आम्ही बोलत बोलत परत मेसजवळ आलो असता मी पुन्हा त्यांना विनंती केली असता त्यांनी '' अभी इससे कम मै नही कर सकता, चलो दस और कम कर दो, साठ कर दो, साठ '' असे म्हणून साठ हजार रूपये मागितले. त्यावर मी त्यांना ठिक है सर असे बोललो असता त्यांनी ''जाके आओ'' ठिक है, सत्तर लाके दो' असे बोलून सत्तर हजाराची मागणी केली. त्यावर मी त्यांना आपने साठ बोले थे असे सांगितले असता त्यांनी 'नही नही, दस कम करो बोला थाना, अस्सी मेसे दस कम करो कितना होता सत्तर होते, फिर साठ कैसे बोला मैने, अस्सी मे से दस गये कित्ते रहते,' असे बोलून त्यांनी तडजोडीअंती सत्तर हजार रूपये स्विकारण्याचे मान्य केल्याने घडलेली हकीकत सांगणेकरीता मी व पंच क्र.1 सह बसस्टाप कुरखेडा येथे परत आलो. लाच रक्कम मागणी बाबतची पडताळणी कारवाई करून परत आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर 21.25 वाजता बंद केले. नंतर माझी सविस्तर अंगझडती घेतली.

यानंतर श्री. ढोले साहेबांनी पंच क्र. 1 श्री. अशोक रामटेके व मला श्री. दिकोंडवार यांचेसोबत झालेल्या संभाषणाबाबत विचारणा केली. त्यानंतर श्री. ढोले साहेब यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषण ऐकले व पंच क्र. 1 व मी सांगितलेल्या हकिकतीची खात्री केली. लाच मागणी दरम्यान झालेले संभाषण हे मोठया कालावधीचे असल्याने ऐकतांना बराच वेळ खर्च होवून उशीर झाल्याने तसेच माझी प्रकृती अस्वस्थ वाटू लागल्याने तसेच माझे दुसरे दिवशी सकाळी गडचिरोली येथे कोर्टाचे अत्यंत महत्वाचे कायदेशीर काम प्रलंबित असल्याने तसेच श्री. दिकोंडवार यांनी मला दुसऱ्या दिवशी संध्याकाळी येण्यास सांगितल्याने मी दि. 06/08/2025 रोजी संध्याकाळी 07.00 वा. नंतर पुढील कारवाई करण्याची विनंती केल्याने सदर कारवाई स्थगित करून मला दि. 06/08/2025 रोजी संध्याकाळी 07.00 वा. सुमारास बसस्टॉप कुरखेडा येथे हजर राहण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर मी सापळा कारवाईकरीता हजर केलेले व पंचासमक्ष अँथ्रासिन पावडर लावलेली बंद खाकी रंगाचे कागदी पॉकीटात ठेवलेले 1,00,000/-रूपयाचे पॉकीट श्री. जुमनाके यांचेकरवी फाडून सदर पॉकीटातून 1,00,000/-रू. रक्कमेपैकी 30,000/-रू. लाचेची रक्कम काढुन त्यावर अँथ्रासिन पावडर स्वच्छ पुसुन सदर नोटांवर पावडर नसल्याची खात्री करून मला परत देवून लेखी पावती दिली. व उर्वरीत 70,000/-रू. श्री. जुमनाके यांच्या हस्ते लिफाप्यात सुरक्षित ठेवुन सदर लिफापा श्री. ढोले साहेबांनी ताब्यात घेतला. त्याप्रमाणे मी दि.06/08/2025 रोजी संध्याकाळी 07.00 वा. दरम्यान बस स्टॉप कुरखेडा येथे थांबून असतांना दोन शासकीय वाहनाने श्री. ढोले साहेब पंच व स्टॉपसह हजर आले. व बसस्थानक कुरखेडाच्या निर्जन स्थळी कॅम्प लावले. श्री. ढोले साहेबांच्या सुचनेनुसार दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेवून गै.अ. दिकोंडवार यांनी 70,000/- रूपये लाच रक्कमेची मागणी केल्याने श्री. ढोले साहेबांच्या सुचनेवरून श्री. जुमनाके यांनी पंचासमक्ष अँथ्रॉसिन पावडर लावलेली 70,000/- लाचेची रक्कम माझे फुलपॅन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिशात अलगत ठेवले. त्यानंतर सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत स्पष्ट सुचना देवुन गै.अ. दिकोंडवार यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर दर्शनी भागी येवून लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा म्हणुन डोक्यावरून हात फिरवून इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. यानंतर सापळा पथकातील सर्व सदस्यांना त्यांनी सुचना दिल्या.

श्री. ढोले साहेबांच्या सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी नविन मेमरी कार्ड टाकून व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून वेळ 20.10 वाजता व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे बनियानच्या आतमध्ये लटकवून ठेवून मला पंच क्रं. 1 सह मी आणलेल्या दुचाकी वाहन क्रमांक एमएच 33 के 1786 ने गै.अ. हे राहत असलेल्या घरी पाठविण्यात आले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. मी व पंच क्र.1 असे गै.अ. श्री. दिकोंडवार हे राहत असलेल्या गांधी वार्ड कुरखेडा येथील घरी गेलो असता घराचा दरवाजा खुला होता परंतु गै.अ. हे त्या ठिकाणी दिसले नसल्याने मी गै.अ. यांना फोन केला असता गै. अ. यांनी फोन उचलले नाही त्यांचा फोन घरातील खोलीत वाजत असल्याचे ऐकू येत होते, त्यामुळे आंम्ही ते मेस मध्ये जेवन करण्यासाठी गेले आहे असे समजून घराच्या समोरच असलेल्या मेस मध्ये गेलो असता त्या ठिकाणी सुध्दा ते हजर नसल्याने मी पुन्हा गै.अ. राहत असलेल्या घरासमोरच उभा होतो. तेवढयात श्री. दिकोंडवार हे त्यांच्या रूमच्या समोर पोर्च मधून आवाज देवून मला वर बोलावून घेतले. त्यावेळी मी व पंच क्र. 1 असे दोघेही मिळून त्यांच्या राहत्या खोलीमध्ये गेलो तेव्हा त्यांनी माझ्या फुलपॅन्टच्या समोरील उजव्या बाजूच्या खिषाला हात लावून खुर्चीवर



Scanned with CamScanner

बसण्यास सांगितले. त्यांना मी कल आपने अस्सी हजार मोबाईल पे लिखे थे मै बोला आपको सत्तर आपने साठ , सत्तर पे चर्चा हो गयी सर असे विचारता त्यांनी सत्तर कर दो,अरो बोलले. त्यावर मी त्यांना सत्तर हजार असे विचारता त्यांनी हुं असे म्हणुन टेबलवर असलेली आकाशी निळया रंगाच्या सॅकची चैन खोलून माझे समोर ठेवुन हाताच्या बोटाने ईशारा करून डाल दो इसमे असे म्हणुन लाच रक्कम सॅकमध्ये ठेवण्यास सांगितले असता मी त्यांना इसमे रख दु सर असे विचारता त्यांनी मानेनेच हो असा इशारा करून रककम त्यात ठेवणेस सांगीतले असता त्यांचे सुचनेप्रमाणे मी अँथ्रॅसिन पावडर लावलेले रू. 70,000/- लाचेची रक्कम माझे फुल पॅन्टचे समोरील उजव्या बाजुच्या खिशातुन उजव्या हाताने काढुन सॅकमध्ये ठेवली . मी त्यात पैसे ठेवल्यावर श्री. दिकोंडवार बाबु यांनी सदरची सॅक उचलुन त्यांच्या बाजुला ठेवली व आतील नोटा बाहेरून निरखुन बघीतल्या . पैसे मिळाल्याची त्यांची खात्री झाल्याने ते मला अभी आप टेंशन फ्रि हो गये, अभी मेरी जबाबदारी बन गई , ये जो पहली बात आप पेहलेच कर दिये थे तो अबतक आपका काम पेन्डींग मे नही रहता असे बोलुन माझे चालानाचे काम करून देतो असे चर्चा करीत असतांना मी गुळणी करण्याच्या बहाण्याने खोलीच्या बाहेर पोर्चमधील दर्शनी भागी येवून माझ्या डोक्यावरून हात फिरवून सापळा पथकास लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्याचवेळी सापळा पथकाने श्री. दिकोंडवार यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. यानंतर पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर वेळ 20.33 वाजता व्हॉईस रेकॉर्डर बंद केले व नंतर माझी अंगझडती घेतली. लाच रक्कम 70,000/- रू., तसेच विवो कंपनीचा 1 मोबाईल, आकाशी निळया रंगाची सॅक 01 नग श्री. दिकोंडवार यांचेकडुन तसेच नमुद कारवाईतील मेमरी कार्ड पंचासमक्ष जप्तीपत्रका प्रमाणे पुराव्याकामी जप्त केले. सापळा कार्यवाही बाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी श्री. ढोले साहेबांनी पंचनामा क्र. 2 मध्ये घेतले आहेत.

तरी श्री.रविंद्र सदाशिवराव दिकोंडवार,वय 42 वर्षे, पद- मुख्यालय सहायक, उप अधीक्षक, भुमी अभिलेख कुरखेडा ता. कुरखेडा जि. गडचिरोली यांनी मला शेतजमीनीचा पोटहिस्सा मोजणी व सातबारा वेगळा करून देण्यासाठी चालान काढून देण्याचे कामाकरीता पंचांसमक्ष 1,00,000/- रू लाच रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती 70,000/- रू लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारतांना रंगेहात मिळून आल्याने त्यांच्याविरुद्ध माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरिल खबर माझे सांगणेप्रमाणे मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन त्याची प्रिंट काढल्यानंतर मी ती स्वता वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

( चंद्रशेखर ढोले )
पोलीस उपअधीक्षक
ला.प्र.विभाग, गडचिरोली.

(मुजाहिद मसुद शेख)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

MAHENDRA BABURAV WAGH(I (Inspector)) / 15101000402MBWM87015

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

7/8/25

15.Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे [illegible] अधिकारी यांची स्वाक्षरी)

Name(नाव): MAHENDRA, BABURA

Rank(पद): [illegible] (Inspector)

No.(सं.): 15101000402MBWM87



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with CamScanner